## थोडक्यात...

### टेम्पो चालकाच्या खून प्रकरणातील आरोपी अजूनही फरार पोलीसाची शोध मोहीम वेगात

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

**मानवत-** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा व जुन्या वादतील राग मनात धरून टेम्पो चालक ज्ञानेश्वर पवार यांचा कुदळीने डोख्यात घाव घालून निर्घृण खून करणारा मुख्य आरोपी आरोपी मारोती भगवान चव्हाण वय ४० वर्ष अद्याप तो पोलिसांना सापडलेला नाही या कामी तपास वेगात सुरु असून जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली मानवत पोलिसांच्या सहा पथकाची शोध मोहीम सुरू आहे दिनांक सहा जुलै शनिवार रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मानोली फाटा रिंग रोड येथे एका हॉटेलमध्ये सदरील घटना घडली मृत ज्ञानेश्वर पवार हे टेम्पो चालून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते त्यांच्या हत्यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी मयाताचा पुतण्या अभिषेक मारुती पवार वय २४ वर्ष यांच्या फिर्यादीवरून मारुती चव्हाण यांच्यावर खुनाचा गुन्हा मानवत पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला आहे परंतु आरोपी खून केल्यापासून आजपर्यंत फरार झालेला असून आज पर्यंत सापडलेला नाही मानवत पोलीस स्टेशनच्या स्थानिक गुन्हे विभागासहित वीस पोलिसांच्या सहा पथक कसून शोध घेत आहेत आरोपी दिसल्यास नागरिकांनी मानवत पोलीस स्टेशनला तात्काळ माहिती द्यावी अशी माहिती प्रभारी पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांनी दिली आहे

### शिवसेनेच्या पाथरी तालुकाप्रमुखपदी एकनाथ शिंदे यांचे निवड

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी** - माजी जिल्हा परीषद सदस्य तथा धार्मिक ,राजकीय ,सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या (शिंदे गट) च्या पाथरी तालुकाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे .

उपमुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पाथरी तालुकाप्रमुखपदी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा धार्मिक, सामाजिक,राजकीय कामात अग्रेसर असलेले शेतकरी पुत्र एकनाथ शिंदे यांची निवड करण्यात आलेली आहे. शिवसेना नेते सईद खान यांच्या वतीने त्यांची थेट निवड करत त्यांना नियुक्तीपत्रही देण्यात आले आहे.सर्वच क्षेत्रातील लोकांशी संबंध असल्याने एकनाथ शिंदे यांच्या या निवडीमुळे शिवसेनेला याचा निश्चितच संपूर्ण तालुक्यात फायदा होणार आहे.

राजकारणाचा दांडगा अभ्यास आणि हरिभक्त पारायण असल्याने बोलण्याची साधी सरळ आणि काळजात घर करणारी शब्दशैली यामुळे कानसूरचे भूमिपुत्र असलेले एकनाथ शिंदे सर्वांच्या ओळखीचे आणि आपलेसे वाटणारे आहेत.या निवडीनंतर नवनिर्वाचित शिवसेना पाथरी तालुकाप्रमुख एकनाथ शिंदे यांचे शिवसेना नेते सईद खान,असेफ खान,मुंजाजी भाले पाटील,नाना टाकळकर,पप्पू घाडगे,सदाशिव थोरात,युसूद्दीन अन्सारी,अमोल भाले,शाकेर सिद्दीकी,लालू खान,अलोक चौधरी,ताजू बाबा,इरफान शेख,साजेद राज,खालेद दादा, देवा इंगळे, शिवाजी इंगळे इत्यादीसह सर्वच शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# आध्यात्मिक भक्ती परंपरेत श्रावण महिना महत्त्वाचा मानला जातो - आ.डॉ.गुट्टे

(अली चाऊस/दै.धर्मयोध्दा)



**गंगाखेड-** श्रावण महिना हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि पुण्यदायक असा काळ मानला जातो. याला भगवंताच्या उपासनेचा महिना म्हणून ओळखले जाते. विशेषतः भगवान शिवाचा हा अतिशय प्रिय महिना मानला जातो. याच काळात भाविक भक्त मोठ्या भक्तिभावाने शिवमंदिरात जाऊन जलाभिषेक, रुद्राभिषेक, आणि विविध पूजाविधी करतात. सोमवारचे व्रत, शिवनामस्मरण, मंत्रजप आणि उपवास ही या महिन्यातील प्रमुख आध्यात्मिक क्रिया आहेत. संपूर्ण श्रावणभर वातावरण भक्तिपूर्ण आणि सात्त्विक राहते, जे मन:शांती आणि आत्मिक उन्नतीस कारणीभूत ठरते. त्यामुळे आध्यात्मिक भक्ती परंपरेत श्रावण महिना महत्त्वाचा मानला जातो, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

तालुक्यातील मौजे.इसाद येथील प्रसिध्द नर्मदेश्वर महादेव मंदिरात आ.डॉ.गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री महादेव मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधून श्रावण महिना आणि आध्यात्मिक परंपरेचा दाखले दिले. तसेच प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने सर्वांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी श्री महादेवांचे मनोभावे दर्शन घेतले. शिवाय, उपस्थित सर्वांना श्रावण मासाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मंत्रोच्चार, वेदघोष आणि विधिपूर्वक पार पडलेल्या या दिव्य पूजनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. यावेळी प्रसिद्ध ह.भ.प विजयानंद महाराज सुपेकर यांचे अतिशय सुश्राव्य कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

पुढे आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, आध्यात्मिक दृष्टिकोनातून ही मूर्ती प्राणप्रतिष्ठा अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यामुळे या पुरातन मंदिरातील ही शिवमूर्ती केवळ एक शिल्प न राहता भक्तांसाठी साक्षात शिवस्वरूप ठरेल. कारण, श्रद्धा, भक्ती आणि समर्पण हीच भारतीय संस्कृतीची खरी ओळख आहे. हा प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम म्हणजे नवचैतन्य निर्माण करणारा आध्यात्मिक सोहळा आहे. नर्मदेश्वर महादेव मंदिर हे केवळ उपासनेसाठीचे स्थान नसून ते सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संस्काराचे केंद्र आहे

दरवर्षी श्रावणात पारंपरिक धार्मिक परंपरांचा जागर होतो. कीर्तन, प्रवचन, भजन, हरिपाठ, मंदिरातील विशेष उत्सव, पालख्या आणि धार्मिक यात्रांचा समावेश यामध्ये होतो. यामागे केवळ धार्मिक भावनाच नाही, तर सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा उद्देश असतो. श्रावण महिना हा आचार, विचार आणि व्यवहार शुद्ध ठेवण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे या महिन्यात केलेली उपासना, सेवा, दान आणि धार्मिक कृत्ये अनेक पटींनी पुण्यदायी मानली जातात. ही परंपरा केवळ श्रद्धेवर आधारित नसून, ती अध्यात्माशी जोडलेली आत्मिक उन्नतीची वाटचाल आहे, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी आवर्जून सांगितले. यावेळी मित्र मंडळाचे विधानसभा अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य किशनराव भोसले, राजेभाऊ बापू सातपुते, माजी सरपंच सर्जेराव सातपुते, भोजराव नाना सातपुते, बाबासाहेब भोसले, बालासाहेब भोसले, ज्ञानोबा सातपुते, मारुती सातपुते यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषीदूतांकडून कलम बांधणीची प्रात्यक्षिक



**छत्रपती संभाजीनगर** - वसंतराव नाईक मराठवाडा, परभणी संलग्न व श्री धनेश्वरी मानव विकास मंडळ संचलित श्री धनेश्वरी कृषी महाविद्यालय गेवराई तांडा छत्रपती संभाजीनगर येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागृती कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्न या कार्यक्रमात अंतर्गत पाटोदा जि.छ.संभाजीनगर येथे कृषिदूत सचिन कोळपे, उदय मोरे ,आदित्य खरात, राज कुशावर, संकेत मोटे ,श्रुती मोरे, श्वेता गुलापेली, यश महाजन, यशवंतराज कोंगा, मयुरी पठारे, रामेश्वर म्हस्के, विरेंधर मालावथ .यांनी शेतकऱ्यांना कलम बांधणीच्या पद्धतीसह कोणकोणत्या झाडांना ही पद्धत उपयुक्त ठरते, कलम बांधताना कोणती काळजी घ्यावी, त्या झाडाचे कसे संरक्षण करावे, याबाबत मार्गदर्शन करतानाच कलम बांधणीचे फायदे सांगितले आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी सरपंच कपिंद्र पेरे व गावातील शेतकरी उपस्थित होते ,यासाठी कृषिदूतांना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष वैद्य , उपप्राचार्य डॉ. गजानन फुके,प्रशासकीय अधिकारी रमेश भालकर सर, कार्यक्रम अधिकारी प्रा. निखिल सोनोने, प्रा शीतल ढाकणे, विषय तज्ञ प्रा. संदीप शिंदे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

## सर्जेराव खंदारे यांची जनप्रहार संघटनेच्या युवा जिल्हाध्यक्ष पदी निवड

(शिवा पाटील/ दै.धर्मयोध्दा)



**सेनगाव** - तालुक्यातील पार्डी पोहकर येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते सर्जे राव खंदारे यांची आज जनप्रहार बांधकाम कामगार संघटनेच्या हिंगोली युवा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून त्यांना आज नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. सर्जेराव खंदारे यांचे जनप्रहार बांधकाम कामगार संघटनेतील उत्कृष्ट कार्य पाहता त्यांना दुसऱ्यांदा या पदावर संधी देण्यात आली यावेळी जनप्रहार बांधकाम कामगार संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्जेराव खंदारे यांनी जनप्रहार बांधकाम कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी नेहमी पुढाकार घेतला आहे. तसेच त्यांनी संघटनेत केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांच्या खांद्यावर दुसऱ्यांदा युवा जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली असून मिळालेल्या या जबाबदारीबद्दल सर्जेराव खंदारे यांनी जनप्रहार बांधकाम कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

### आनंदराव देशमुख यांचे निधन

**जिंतुर-** शहरातील आमदार कॉलनी येथील ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त मुख्याध्यापक आनंदराव गणेशराव देशमुख वय ७१ वर्षे( ए.जी देशमुख गुरुजी)यांचे ३० जुलै रोजी सायंकाळी चार वाजता वर्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून , नातवंड असा परिवार आहे .जिंतूर संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष अभिजीत देशमुख यांचे वडील होत. उद्या ३१ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता जिंतूर येथील वैकुंठ धाम समशानभूमीत अंत्यविधी होणार आहे.

## गावकुसातल्या कलाकाराचं पेंटिंग मुख्यमंत्र्यांच्या दालनात;पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा पुढाकार

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)



**पाथरी** - नुकतेच महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड किल्ल्यांची ऐतिहासिक जागतिक वारसा म्हणून नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाथरी तालुक्यातील वाघाळा या गावकुसातील चित्रकार सुशील घुंबरे यांनी स्वहस्ते बनवलेले रायगड किल्ल्याची प्रतिकृती असलेले कॅनव्हास पेंटिंग मंगळवार २९ जुलै रोजी मंत्रालयातील मुख्यमंत्र्यांच्या दालनात कॅबिनेट बैठक संपल्या नंतर परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना मेघनादिदी बोर्डिकर यांच्या पुढाकारातून मुख्यमंत्र्याला भेट म्हणून दिले.

या वेळी मंत्री ना गिरिश महाजन,ना अतुल सावे,आ मोनिकाताई राजळे,आ सिमाताई हिरे,आ सुरेश धस, रणजित नाईक निंबाळकर,आदी मान्यवरांची उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून महाराष्ट्राचा राज्य कारभार चालवणारे सन्मानीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना आज अतिशय उत्कृष्ट असे छत्रपती शिवाजी महाराज व किल्ले रायगडाची प्रतिकृती असलेले भव्य असे स्वहस्ते बनवलेले कॅनव्हास पेंटिंग चित्रकलेचे पदविधर असलेल्या सुशिल घुंबरे या परभणी जिल्ह्यातील वाघाळा ता. पाथरी येथील या चित्रकाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट दिले. या पेंटिंगला ''जपतो आम्ही शिवछत्रपतीचां वारसा'' असे नाव देण्यात आले आहे.

राज्यसरकारच्या विशेष प्रयत्नाने काही दिवसांपुर्वी स्वराजातील १२ गडकिल्ल्यांना युनो ने जागतिक वारसास्थळाच्या यादीत समाविष्ट केले आहे. याचा आनंद महाराष्ट्रासह देशातील सर्व शिवप्रेमींना झाला आहे. राज्यांच्या राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री ना.मेघनाताई बोर्डिकर यांनी वाघाळा ता.पाथरी गावचे चित्रकार सुशिल घुंबरे यांना त्यांच्या कलेला वाव मिळावी म्हणून छत्रपती शिवराय व किल्ले रायगडाची कलात्मक अशी एक पेंटिंग तयार करण्यास सांगितले होते. सुशील घुंबरे यांनी अगदी कमी वेळेत हे अतिशय सुंदर असे शिवाजी महाराजांचे पेंटिंग तयार केले. आज ते पेंटिंग जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना दिले असता मुख्यमंत्र्यांना हे पेंटिंग खुप आवडले मुख्यमंत्र्यांनी परभणीचे चित्रकार सुशिल घुंबरे यांच्या कलेच भरभरून कौतुक केले. सुशिल घुंबरे यांनी रेखाटलेले हे कॅनव्हॉस पेंटींग आता थेट मुख्यमंत्र्यांच्या दालनातील भिंतीवर दिसणार आहे. या वेळी मुख्यमंत्री ना देवेंद्रजी फडणविस, परभणीच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह उपस्थित भाजपा युवा मोर्चाचे हनुमान घुंबरे,चित्रकार सुशिल घुंबरे यांनी या कलाकृती सह फोटो घेतला.

## श्री क्षेत्र चारठाणा ते श्री क्षेत्र औंढा नागनाथ कावड यात्रेच आयोजन

(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)



**चारठाणा** - दरवर्षी प्रमाणे -याही वर्षी मौजे चारठाणा येथून श्रीक्षेत्र औंढा नागनाथ कडे दि ०५/०८/२०२५ मंगळवार रोजी कावड यात्रेचे चारठाणा येथून सकाळी ९ वाजता औंढा नागनाथ कडे प्रस्थान होणार आहे. तरी गावातील सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने कावड यात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दि ५/०८/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता कावड यात्रेचे मौजे चारठाणा येथील बसवेश्वर चौक येथून कावड यात्रेचे प्रस्थान होणार आहे. कावड पदयात्रेसाठीअनेक ठिकाणी चहापाणी ,नाष्टा ची व्यवस्था करण्यात आली. पहिला मुक्काम भोगाव येथे राहणार आहे. भोगाव येथे नागनाथ मुंजाआप्पा साखरे यांच्या वतीने जेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दिनांक ०६/०८/२०२५ रोजी सकाळी भोगाव येथून येळी केळी मार्गे औंढा नागनाथ कडे प्रस्थान होणार आहे. दुपारी विश्रांती येळी केळी येथील मंगलकार्यालय येथे पदयात्रा थांबणार आहे. येथे दुपारच्या जेवण्याची व्यवस्था प्रल्हादमामा नागरे यांच्या कडून करण्यात आली आहे. दुसरा मुक्काम औंढानागनाथ येथे असेल या ठिकाणी संध्याकाळीची जेवण्याची व्यवस्था भारतदादा तोडकर व कैलास राऊत यांच्या वतिने करण्यात आली आहे. या कावड यात्रेत सुमारे १५० ते २०० शिवभक्तांचा सहभाग असणार आहे . चारठाणा येथील गावकऱ्यांच्या वतीने कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे

## सैन्यदलातील संधींना करिअर म्हणून बघावे - लेफ्टनंट कर्नल संतोष मोहिते

## श्री शिवाजी महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा



**परभणी** - राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनी तसेच संयुक्त संरक्षण सेवेच्या माध्यमातून वेगवेगळ्या स्तरावरील विविध पदासाठी भरती प्रक्रिया केली जाते. सैन्यदल, वायुदल तसेच नौदलातील पदांसाठी अर्हता प्राप्त उमेदवाराची भरती केली जाते. सैन्यातील या संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे असे आवाहन परभणीचे भूमिपुत्र असलेले १/९ गोरखा रेजिमेंटचे लेफ्टनंट कर्नल संतोष मोहिते यांनी मंगळवार (दि.२९) रोजी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी विभागाच्या वतीने आयोजित कारगिल विजय दिवसाच्या कार्यक्रमाचे ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रमुख उपस्थितीत बाळासाहेब मोहिते, उपप्राचार्य डॉ श्रीनिवास केशट्टी,उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे, गुणवत्ता कमी कक्षाचे डॉ. उत्कर्ष किट्टेकर तसेच एनसीसी प्रमुख मेजर डॉ. प्रशांत सराफ यांची उपस्थिती होती.

भारतीय सैन्य दलातील संधी आणि आव्हाने या विषयावर एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन करताना लेफ्टनंट कर्नल संतोष मोहिते पुढे म्हणाले, सैन्यात करिअर करण्यासाठी ध्येय निश्चिती, शिस्त, नियमितता, प्रामाणिकता, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन, समाज माध्यमापासून दूर राहणे या गोष्टी पाळणे गरजेचे आहे. युवकांनी आपल्या क्षमतांना ओळखून आपले करिअर घडवत असताना सैन्यदलातील संधींना शोधावे. यात व्यवसायिक, तंत्रज्ञान आधारित, क्रीडा, व्यवस्थापन, भाषा इत्यादी क्षेत्राला ही प्राधान्य दिले पाहिजे. सैन्यात कायम कमिशन आणि अल्पावधीतील कमिशन अशा दोन प्रकारच्या भरती होतात. या भरतीसाठी मुलाखत हा महत्त्वाचा टप्पा असतो. या मुलाखतीच्या माध्यमातून उमेदवाराची मानसिक क्षमता तपासली जाते. त्यासाठीही विद्यार्थ्यांनी तयार व्हावे. आज सैन्यामध्ये मुलींना विशेष संधी उपलब्ध झाल्या आहेत त्याचा फायदा विद्यार्थिनींनी घ्यावा. समाज माध्यमातून आपण आपला वेळ वाया न घालवता करिअरवर लक्ष द्यावे जेणेकरून आपण यशस्वी होऊ. यशामध्ये अडथळे निर्माण होतात परंतु ते आत्मविश्वासाने आणि संयमाने दूर करून यशाचे शिखर गाठावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी कारगिल युद्धाच्या संदर्भातल्या महत्त्वाच्या घडामोडी उपस्थितांना सांगून सैन्यदलातील वेगवेगळ्या पदासाठीच्या संधी, अनुशासन, नियम, शिस्त आणि करिअरच्या संधी याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव म्हणाले, एनसीसी कॅडेट्स देश सेवेसाठी नेहमी तत्पर असतात. एनसीसी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, अनुशासन निर्माण करते तसेच देशसेवेची भावना तयार करते. एनसीसी युनिट मधली मुलींची वाढती संख्या चांगली असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी पौर्णिमा लोखंडे, काजल गिरी, जयश्री जैस्वाल यांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेजर डॉ. प्रशांत सराफ यांनी, पाहुण्यांचा परिचय श्रुती पतंगे हिने सूत्रसंचालन मोहिनी चव्हाण तर आभार किशोरी राखोंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रूपाली गोटे, अश्विनी लोंढे, भागवत पांढरे,जय कदम आदींनी पुढाकार घेतला.

## साईनगरमधील चिखलाने लोकांचे हाल; लेखी तक्रारीचीही दखल नाही,आंदोलनाचा इशारा!



(प्रदिप सावले/ दै.धर्मयोध्दा)

मालेगाव शहरांमध्ये एवढी बिकट समस्या झाली आहे की कुठलीही नगरपंचायतला तक्रार द्या ठोस पावले उचलल्या जात नाही सर्व सामान्याचे हाल होत आहे ज्या ठिकाणी वस्ती नाही घरे नाही त्या ठिकाणी रोड केल्या गेलेला आहे विश्रामगृहाच्या बाजूने कुठल्याही घर नाही परंतु दहा लक्ष रुपयाचा रोड केला गेला आहे हे नेमका कसा आणि ज्या प्रभागांमध्ये वस्ती आहे लोकसंख्या आहे तिथं रोड नाही नाल्या नाही नेमकं कारण काय असावा सर्वसामान्य जनतेतून होत आहे

**मालेगाव** - येथे वार्ड क्रमांक ५ साईनगर येथे पावसाळा सुरू होताच रस्त्यांची दुरवस्था समोर आली आहे दिनांक २७ जून रोजी नगरपंचायत मालेगावचे मुख्याधिकारी यांना लेखी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून,रहदारी करणाऱ्या वाहनधारकांपासून ते शाळकरी मुलांपर्यंत सर्वांनाच नाहक त्रास सहन करावा लागत आहे या तक्रारीत स्थानिकांनी स्पष्टपणे नमूद केले होते की, ''आकाश भाऊ आढाव ते गोपाल हरिहर यांच्या घरापर्यंतचा रस्ता इतका खराब आहे की,त्या भागातून चालणे ही मोठी कसरत झाली आहे पावसाचे पहिले आगमनच इतकी अवस्था करून ठेवत असेल,तर पुढील संपूर्ण पावसाळ्यात काय होईल याची कल्पनाच करवत नाही ''रहिवाशांनी मुख्याधिकाऱ्यांना विनंती केली होती की,या भागात तातडीने मुरम टाकून किमान तात्पुरती सुविधा तरी द्यावी मात्र,सध्या पर्यंत कोणतीही हालचाल प्रशासनाने केलेली दिसत नाही यामुळे रहिवाशांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. ''जर प्रशासनाने आमच्या या मागणीची तातडीने दखल घेतली नाही,तर लोकशाही मार्गाने नगरपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला जात आहे,'' असे तक्रारकर्त्यांनी म्हटले आहे नगरपंचायतने याची गंभीर दखल घेऊन त्वरीत कृती न केल्यास,याचे तीव्र पडसाद उमटू शकतात,हे निश्चित आहे प्रशासनाने वेळेत उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao